वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडच्या वेशी, मुस्लिमांच्या हाती....!

## मताच्या विभाजनात, भाजपचं पारडं जड

Email.- dailydivyawarta@Gmail.com
Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता



**बीड, (दिव्य न्युज):– स्थानिक स्वराज्य संस्थेच्या रणांगणात बीड नगरपरिषदेत चौरंगी लढत पहायला मिळणार आहे. अजित पवारांच्या पक्षा कडून प्रेमलता पारवे, शरद पवार गटाकडून विष्णू वाघमारे यांच्या पत्नी , एमआयएम पक्षाकडून सुरेखा हर्ष शृंगारे तर भाजपा कडून डॉ. ज्योती घुमरे मैदानात उतरल्या आहेत.३० वर्ष सत्ता भोगणाऱ्या क्षीरसागर परिवाराचे राजकीय वलय पाहता बीड नगरपरिषदेवर त्यांनी सत्ता एकहाती गाजविण्याचा इतिहास आहे. अजित पवार गटाच्या परवाच्या नाट्यमय प्रकारात घड्याळ शिवछत्र बंधूनी आपल्या हाती घेत आपला श्वास आता गुदमरतो आहे या कारणाने बीड विधानसभा अध्यक्ष योगेश क्षीरसागर हे यांनी भाजप मध्ये प्रवेश केला.**

बीड जिल्ह्यातील, बीड माजलगाव परळी नगर परिषदेच्या निवडणुकीत मुस्लिम समान हां निर्णायक भूमिकेत पहायला मिळणार आहे. याच करणाने माजलगाव नगरपरिषदेत अजित पवार व शरद पवार गटाने दोन्ही उमेदवार हे मुस्लिम दिल्याने लढत पाहण्याजोगी असणार आहे अशी चर्चा सुरू आहे.बीड शहरातील मुस्लिम समाज मतदाता हा जवळ जवळ ६५ हजारात असल्या करणाने जिकडे मुस्लिम समाजाचा कल असेल त्याच उमेदवाराला गुलाल उधळ्याचा अधिकारी असणार आहे अशी गणितं विश्लेषकांकडून लावली जाताय. परंतु मताच्या गाठोड्यात तीन वाटेकरीम्हणून दोन पवार गट तर एक एमआयएम यांच्याकडे पाहिलं जातंय.

स्थानिक स्वराज्य संस्था जरीही जातीच्या समीकरणावर होत नसली तरीही जातीच्या आडून मतांचं समीकरण जुळवायला भाजप नेते योगेश क्षीरसागर व डॉ सारिका क्षीरसागर यांनी सुरुवात केल्याच दिसून येतंय. ३३ टक्के विरुद्ध ५४ टक्के हा आकडा या निवडणुकीत फार महत्वाचा मानला जातो.२० हजाराच्या घरात असणारा मराठा समाज संदीप क्षीरसागर यांच्या मागे जरी मराठा आरक्षण या मुद्द्याने उभा राहिला तरीही ६० हजाराच्या घरात असणारा मायक्रोओबीसी समाज ओबीसी आमचा डीएनए या घोषवाक्यात एकवटून योगेश क्षीरसागर यांच्या वाट्याला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही..

गेल्या कही दिवसापासून निवडणुकीच्या तोंडावर बीडच्या अजित पवार गटात ज्या प्रकारे उलथापालथ झालीय याने विजयाच गणित चुकल्याच समजतय. आंबेडकरी चळवळीतल्या पप्पू कागदे यांना उमेदवार घोषित करून शेख मुजीब यांच्या सासूच्या हातात घडी बांधण्याचा कार्यक्रम शिवछत्र परिवाराच्या जिव्हारी लागण्याचे संकेत पहायला मिळताय. गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी ▶▶ पान २ वर

### दगाबाजी करून दिलगिरी भोवणार....!

गेवराईचे विद्यमान आमदार विजयराजे पंडित यांनी काल पप्पू कागदे यांच्या वर अन्याय झालेल्या भूमिकेवरून दिलगिरी व्यक्त केली. आंबेडकरी चळवळीने अजित पवारांच्या घडीला दलित वस्त्यात नो एन्ट्री म्हणत घडीची चांगलीच गोची झालेली दिसतेय हे बोलले जात आहे.

### भाजप पुन्हा कमबॅक मोड मध्ये...

राज्याच्या वर्तुळातसोबतच ओबीसी मत हे बीडच्या राजकीय गणितात 'किंगमेकर' मानले जात असल्याने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने ही मोहीम अधिक धारदार केली आहे. ओबीसी मतदारांना पुन्हा आकर्षित करण्याच्या प्रयत्नात ही मोहीम कितपत परिणामकारक ठरेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राजकारणातला अजातशत्रू, समाजकरणातला सेवेकरी- अशफाक इनामदार

## नेतृत्व हे घोषणांनी नव्हे, तर कृतींनी सिद्ध होतं



**बीड ,(दिव्य न्युज):– स्थानिक राजकारणात अनेक चेहरे येतात–जातात, पण काही नेते असे असतात, जे फक्त निवडणुकीपुरते नव्हे तर प्रत्येक संकटाच्या क्षणी जनतेसोबत खांद्याला खांदा लावून उभे राहतात.गेल्या काही वर्षांत त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा आलेख सतत उंचावत गेला. एक सर्वसामान्य कार्यकर्त्यापासून ते लोकांच्या आशा–अपेक्षांचे केंद्र बनण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. विकास हा एकमेव अजेंडा ठेवून त्यांनी रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधा प्राधान्याने उभारल्या. त्यामुळेच आज अशफाक इनामदार या नावावर विश्वासाचा शिक्का मारला गेलाय.**

बीड मधील वॉर्ड क्रमांक १८ या प्रभागाचं नेतृत्व करणाऱ्या अशपाक इनामदार यांच्या नावावर सेवेचा वसा लाभलेला आहे.स्थानिक स्वराज्य संस्थेच्या रणांगणाच बिगुल वाजलेल असताना अजित पवारांच्या पक्षाचे अशपाक इनामदार हे वॉर्ड नो.१८ मधून नगरसेवक या पदासाठी खिंड लढवायला सज्ज आहेत. तत्कालीन नगर पालिकेचे माजी सभापती पदावर असणाऱ्या ▶▶ पान २ वर

## साथीला सय्यद नदीम या जोडीला मिळणार विजय

# तुतारीकडून प्रचाराचा शुभारंभ

## मतदारांचा उत्साह बीडच्या विकासाला नवी दिशा देणार– आ.संदीप क्षीरसागर



बीड ,(दिव्य न्युज):- बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून शुभारंभ करण्यात आला. शहरातील प्रभाग क्रमांक २ आणि प्रभाग क्रमांक १८ मध्ये कॉर्नर बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी,मतदारांमध्ये दिसणारा उत्साह हा बीडच्या विकासाला नवी दिशा देणारा आहे. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले. तसेच नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असलेल्या सौ.स्मितातार्इ विष्णू वाघमारे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि मित्रपक्ष शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सर्व उमेदवारांना मतदानरूपी आशीर्वाद देऊन विजयी करा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत, लोकांसाठी प्रामाणिक काम करणारे उमदेवार निवडून दिले आहेत. या उमेदवारांना मतदार निश्चितच स्वीकारणार आहेत. मतदार बांधवांमध्ये दिसणारा उत्साह हा बीडच्या विकासाला नवी दिशा देणारा आहे. असे आ.क्षीरसागर यांनी सांगितले. गुरुवार (दि.२) रोजी सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रचाराला सुरुवात झाली. प्रभाग क्रमांक २ मध्ये नगरसेवक पदाच्या उमेदवार असलेल्या सौ.स्वाती सचिन दुधाळ आणि श्री.विष्णू शामराव वाघमारे तसेच प्रभाग क्रमांक १८ मधून उमेदवार असलेले शेख अब्दुल मुखीद अब्दुल रज्जाक (मुखीद लाला) आणि शेख फरहीन अर्शान (शेख रोहिल रफिक) यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या कॉर्नर बैठकांनी प्रचार कार्यक्रमाला ▶▶ पान २ वर

# राष्ट्रवादीच्या विजयासाठी सना मलिक बीडमध्ये

## प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवकांच्या प्रचारार्थ आज आणि उद्या सभा, रॅली



बीड, (दिव्य न्युज):- बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट), शिवसेना आणि शिवसंग्राम मित्र पक्षाच्या संयुक्त उमेदवार प्रेमलता दादासाहेब पारवे यांच्यासह पक्षाच्या नगरसेवक पदाच्या ५२ उमेदवारांच्या प्रचारार्थ जोरदार मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. याच अनुषंगाने राष्ट्रवादीच्या फायरब्रँड नेत्या तथा आमदार सना मलिक यांच्या कॉर्नर सभा, बैठक आणि रॅली आज शुक्रवार दि.२१ आणि उद्या शनिवार दि.२२ नोव्हेंबर रोजी बीड शहरात आयोजित करण्यात आल्या आहेत.

निवृत्त नायब तहसीलदार असलेल्या प्रेमलताताई पारवे यांना प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव आहे. आता या अनुभवाला आमदार सना मलिक यांच्यासारख्या तरुण आणि आक्रमक नेत्याच्या प्रचारसभांचे राजकीय बळ मिळणार आहे.प्रशासकीय अनुभव असलेल्या प्रेमलताताई पारवे यांना निवडून देऊन बीड शहराला मॉडेल सिटी बनवण्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी मतदारांना आवाहन करणे हा या सभांचा मुख्य उद्देश आहे. आमदार सना मलिक ▶▶ पान २ वर

# प्रभागच्या राहिलेल्या विकासासाठी जलील लालाच निवडुन देणार

## प्रभागातील मतदारात एकच चर्चा




### आपला माणूस, हक्काचा माणूस

बीड, (दिव्य न्युज):- प्रभाग क्रं. ६ मधून जलील लाला यांनाच प्रभागातील मतदारांचे जोरदार समर्थन मिळत आहे. प्रभागाच्या राहिलेला विकास करण्यासाठी जलील लालांनाच निवडून देणार ही एकच चर्चा प्रभागातील मतदारांमध्ये होत आहे. जलील लाला म्हणजे आपला हक्काचा माणूस.... यामुळे प्रभागात तुतारीचा जोरदार आवाज वाढला आहे. आज उमेदवार अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवसहोता. दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज ▶▶ पान २ वर

## ऐन निवडणुकीत अजितदादांच्या शिलेदारांची धुसफूस

# आ.धनंजय मुंडेंना माझ्या मतदार संघात पाठवू नका

**माजलगाव, (दिव्य न्युज):- ऐन नगरपालिका निवडणुकीत, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील आमदारांमधील वाद चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. पदाधिकारी, कार्यकर्त्यांमधील वादाबरोबर आमदारांमधील वाद, देखील थेट निवडणुकीच्या मैदानात येऊ लागले आहे.बीडमधील माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी स्टार प्रचारक म्हणून, आमदार धनंजय मुंडे यांना माझ्या मतदारसंघात पाठवू नका, असा थेट पक्षाला निरोप पाठवला आहे. पाठवल्यास वेगळेच काहीतरी विपरीत घडेल, अशी भीती देखील व्यक्त केली आहे. प्रकाश सोळंके यांनी थेट पक्षाला धनंजय मुंडेंबाबत, असा निरोप दिल्याने खळबळ उडाली आहे.**



नगरपालिका निवडणुकीच्या अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. निवडणुकीचं आज चित्र स्पष्ट होताच, महायुती आणि महाविकास आघाडीतील मित्रपक्षांसह मैदानातील उमेदवारांनी प्रचाराला गती घेतली आहे. पक्ष पातळीवर देखील प्रचाराची रणनीती आखून नेते मैदानात उतरले आहे.

पक्षांनी स्टार प्रचारक जाहीर करत, त्यांना मैदानात उतरले आहे. प्रचारामुळे राज्यातील निवडणुकीचं वातावरण ऐन हिवाळ्यात तापलं आहे. पण यातच आपापसातील हेवेदावे देखील समोर येऊ लागले आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि त्यानंतर समोर आलेल्या गुन्हेगारीमुळे बीड जिल्हा अतिशय संवेदनशील बनला आहे. मराठा, ओबीसी राजकारणासाठी तर बीड जिल्हा राज्याची राजकीय रणभूमी ठरला होता. यात सर्वाधिक अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे टार्गेट झाले.

सोळंकेचा थेट पक्षाला निरोप

आता नगरपालिका निवडणुकीत याच पक्षातील नेत्यांमुळे मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी प्रचारक म्हणून धनंजय मुंडे यांना मतदारसंघात पाठवण्यास विरोध केला आहे. तसा त्यांनी पक्षाला निरोप देखील पाठवला आहे. 'ते इथं स्टारपणा काय दाखवतील, त्यांनी स्टार प्रचारक म्हणून परळीतच काम करावं, ते माजलगावमध्ये आले, तर वेगळेच काहीतरी विपरीत घडेल,' अशी भीती प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केली आहे.

परळीतच युती कशी?

प्रकाश सोळंके म्हणाले, परळीमध्ये मुंडे बहीण-भावाची युती होती. मग जिल्ह्यात का होत नाही? युती होऊ नये म्हणून काहींनी प्रयत्न केले. मात्र युती होण्यासाठी कोणीही पुढाकार घेतला नाही, हे दुर्दैव आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये युती होणं खूप अवघड आहे आणि त्यामध्ये बीड जिल्ह्यात फक्त परळीमध्ये युती होते, याकडे लक्ष वेधत प्रकाश सोळंके यांनी लक्ष वेधलं.

युतीसाठी प्रयत्न केले नाहीत

'जिल्ह्यामध्ये इतर ठिकाणी युती होत नाही. पण आम्ही आमची ताकद या निवडणुकीच्या माध्यमातून दाखवून देऊ, असे म्हणत आमदार धनंजय मुंडे आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी युतीसाठी कुठलेही प्रयत्न केले नाहीत. युती होऊ नये यासाठीच खूप प्रयत्न झाले, असे मला वाटत आहे,' असेही प्रकाश सोळंक यांनी म्हटले.'मुंडे बहीण भावाला ज्यांच्याकडे स्टार प्रचारक म्हणून जिम्मेदारी दिली आहे. त्यांना इथं काही बोलवण्याचं कारण नाही, त्यांचा इथं काय स्टारपणा दाखवतील, त्यांना मी इथं बोलवणारही नाही, कुणाचे काही स्टार प्रचारक म्हणून काम करायचा आहे, त्यांनी परळीमध्ये करावं, आमच्या भागात आले, तर त्याचा विपरीत परिणाम होईल,' असा खणखणीत इशारा सोळंके यांनी दिला आहे.



# ॲड.महेश धांडे यांना प्रचंड मताधिक्क्याने विजयी करा -वीर



बीड (दिव्य न्युज):- नगरपरिषद निवडणुकीच्या पोर्शभूमीवर वार्ड क्रमांक १७ अ मध्ये राजकीय हालचालींना वेग आला असताना, ॲड. महेश अर्जुन धांडे यांची अधिकृत उमेदवार म्हणून घोषणा झाल्यानंतर उत्साहाचं वातावरण निर्माण झालं आहे. तरुण नेतृत्व, अभ्यासू दृष्टीकोन आणि समाजकारणातील सक्रिय सहभाग यामुळे धांडे नागरिकांच्या पसंतीस उतरत आहेत.

स्थानिकांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, गटार व स्वच्छता, क्रीडा सुविधा, महिलांसाठी सुरक्षित जागा इत्यादी मूलभूत प्रश्नांवर धांडे यांनी सातत्याने आवाज उठवल्याने त्यांच्याविषयी सकारात्मक भावना तयार झाली आहे. प्रभागातील युवक व विविध सामाजिक घटकांकडून धांडेंना मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, जनतेचा साथ – विकासाची बात असा नारा लोकप्रिय ठरताना दिसतो आहे. या निवडणुकीत घड्याळ चिन्हावर मतदान करून धांडे यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. वार्ड १७ अ मध्ये ही लढत चुरशीची ठरेल, असे राजकीय विश्लेषकांचे मत असून धांडे यांची लय सध्या आघाडीवर असल्याचे बोलले जात आहे.

## रस्त्यावरची अडचण दूर करण्यासाठी जिल्हा वाहतुक शाखा व नगरपालिकेचे संयुक्त विशेष अभियान

### अतिक्रमण धारकांवर कडक शिस्तभंग मोहीम, शंभराहून अधिक अतिक्रमण धारकांवर कारवाई

बीड, (दिव्य न्युज):- या अगोदर फेब्रुवारी व जून महिन्यात शहरातील मुख्य रस्त्यावर अतिक्रमण केलेल्या दुकानदारांना तसेच हातगाड्यांवाल्यांना सरकारी जागेवर अतिक्रमण केल्यास काय होते याचा एकवेळ दणका दिल्यानंतरही शहरातील व्यापारी व स्टॉलचालक काही सुधारण्याचे नाव घेत नसून पुन्हा-पुन्हा मुख्यरस्त्यावर हातगाडे, ओटे, पत्र्याचे शेड दिसू लागल्याने आज दि.२१ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरपालिका आणि वाहतुक शाखेच्या माध्यमातून शहरातील अतिक्रमण धारकांवर कार्यवाही करण्यात आली.

सार्वजनिक रस्ते हे सरकारची मालमत्ता आहे ही बाब माहिती असतांना व्यापार्यांकडून, स्टॉलचालक तसेच हातगाड्यावाल्यांकडून नियमांचे उल्लंघन करुन बीड शहरातील बस स्टॅण्ड, साठे चौक, सुभाष रोड, माळीवेस, आदी मुख्य रोडवरील दुकानदारांनी व स्टॉल चालकांनी रस्त्यावर केलेले अतिक्रमण, हातगाड्यावाले, टपर्यावाले सर्वांचे अतिक्रमण होवू लागले त्यामुळे नगरपालिका आणि जिल्हा वाहतुक शाखेने अतिक्रमण काढून रस्त्यांना मोकळा श्वास घेवू दिला. त्यामुळे बीड शहरातील रस्ते मोठे वाटू लागले आणि वाहने व नागरिकांना जाण्यासाठी रस्ता सुलभ झाला होता. आज रोजी झालेल्या कारवाईत १०० पेक्षा अधिक अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्यात आली. यावेळी एपीआय सुभाष सानप , पीएसआय विजय जाधवर, पोलीस हवालदार आदिनाथ मुंडे, पोलीस अंमलदार संजय टुले, चिंतामण शिंदे, राहुल घाडगे, संतोष मोरे, पोलीस हवालदार चालक संतोष हारके, नारायण वाघमारे, शेख मॅडम तसेच नगर पालिकेचे अतिक्रमण प्रमुख मुन्ना गायकवाड सोबत सुजित जाधव, विकी दांगट, शरद खुपसे, राम रोकडे, किरण शिंदे, लखन साबळे आदींची उपस्थिती होती.तसेच सपोनि सुभाष सानप यांनी कळविले आहे की, व्यापार्यांनी या पुढे रस्त्यावर अतिक्रमण करु नये व प्रशासनाला सहकार्य करुन कर्तव्याची जबाबदारी घ्यावी अन्यथा अतिक्रमणाची मोहीम थांबणार नाही असा इशारा दिला आहे.

पान १ वरून

## कारेगव्हाण येथे

घुगे यांनी गावकऱ्यांचे मुद्दे शांतपणे ऐकून घेत ठोस उपाययोजनांची हमी दिली. ग्रामस्थांनीही रस्ते, पाणीपुरवठा, शेतीसंबंधी अडचणी तसेच सामाजिक उपक्रमांची गरज यावर आपली मते मांडली. परस्पर संवादातून निवडणुका पारदर्शक व विकासाभिमुख व्हाव्यात, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली. या भेटीद्वारे कारेगव्हाणमध्ये निवडणुकीचे वातावरण रंगतदार झाले असून आगामी दिवसांत या गणातील राजकीय हालचालींना आणखी वेग येण्याची चिन्हे दिसत आहेत.

## वडवणीच्या

धान्याच्या गुणवत्तेची योग्य तपासणी होत नाही. आम्ही काय जाणार आहोत का असा सवाल जनतेतून तहसीलदार यांना करण्यात आला. जर याची चौकशी झाली नाही तर आंदोलन उभारणार जनतेतून व्यक्त होत आहे. वडवणी शहरातील रेशन दुकानातून वितरित होणाऱ्या धान्य पुरवठ्यात ज्वारीचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे समोर आले आहे. ज्वारीमध्ये फुफाटा व अधिक प्रमाणात भुशाचे प्रमाण आढळून येत आहे. गहू व तांदूळ देखील निकृष्ट असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. शासनाच्या वतीने गतवर्षी सण, उत्सवात आनंदाचा शिधा वितरित करण्यात येत होता. यामध्ये नागरिकांना हरभऱ्याची डाळ, तेल, साखर मिळत होती. यामुळे पुरणपोळीचा सणात आनंद घेता येत होता. आता ज्वारी वितरणासाठी रेशन दुकानात पोहोचवण्यात आली. मात्र, ज्वारी अत्यंत निकृष्ट दर्जाची आहे. अशा पध्दतीचे निकृष्ट धान्य कसे खावे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. यासोबत सध्या वाटप करण्यात येत असलेला गहू व तांदळाचीही अशीच स्थिती आहे. अनेक गरीब कुटुंब रेशनच्या धान्यावर अवलंबून आहेत. त्यावरच त्यांचे पोट असल्याने चांगले धान्य मिळेल, अशी अपेक्षा होती, परंतु पोळी ऐवजी शासन भाकरी खाऊ घालत आहे. त्यातही हे धान्य अशा पध्दतीने निकृष्ट दर्जाचे असल्याने आता गोरगरिबाने कसे जगावे , असा सवाल गृहिणी उपस्थित केला आहे. याप्रकरणी तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी लक्ष देऊन तातडीने संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## बीड शहरातील

किरकोळ भाजी विक्रेते, लहान किराणा दुकानदार आहेत. काकू-नाना भाजी मार्केटमधून लहान भाजी ऋ विक्रेते फळभाज्या भाजीपाला, विक्रीसाठी आणतात. दिवसभरातील उन्हाने खराब झालेल्या भाज्या एका ठिकाणी गोळा करून भाजी विक्रेते निघून जातात. मात्र हा कचरा नियमितपणे उचलून नेला जात नाही. त्यामुळे भाजी मंडईत दुर्गंधी पसरली असून पावसाळ्यात अधिक हाल होत असल्याने या ठिकाणी असलेल्या किरकोळ व्यापाऱ्यांनी सांगितले.

पान ४ वरून

## बीडच्या वेशी,

आधी उमेदवार घोषित व नंतर दिलगिरी व्यक्त करणे हा संदेश पीछेहाट झाल्याची चर्चा शहरभर होतांना दिसतेय.स्वाभिमान या मुद्द्यावर पप्पू कागदे, अजिंक्य चांदणे व सर्वच आंबेडकरी चळवळ एकत्र येत अजित पवारांच्या घडीला विरोध करतांना दिसताय. पप्पू कागदे यांची नाकारलेली फक्त आंबेडकरी चळवळीला वेदना देणारी नसून सर्व बहुजन लढवय्यांना वेदना देणारी आहे अशी संतप्त प्रतिक्रिया उमटताना दिसतेय. या सगळ्यात आंबेडकरी जनता घडीची साथ न देता काही प्रमाणात तुतारी तर काही प्रमाणात एमआयएम पक्षाला समर्थन देतील अशी सूत्रांकडून माहिती मिळालीय.

## तुतारीकडून प्रचाराचा

सुरुवात झाली. आयोजन केवळ कॉर्नर बैठकांचे असताना या बैठकांनी सभेचे स्वरूप धारण केले होते. दरम्यान यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, बीड नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.स्मिताताई विष्णू वाघमारे यांची प्रमुख उपस्थित होती.

मनोज मस्के यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस श.प. पक्षात जाहीर प्रवेश

प्रभाग क्रमांक १४ मधून उमेदवार असलेले बीड शहरातील संत नामदेव नगर येथील मनोज मस्के हे गेल्या २५ वर्षांपासून माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर, डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन गुरुवारी (दि.२०) रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. दरम्यान ते त्यांनी दाखल केलेला उमेदवारी अर्ज मागे घेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना (उ.बा.ठा.)पक्षाच्या उमेदवारांसाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या प्रवेश कार्यक्रमावेळी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## राजकारणातला

अशफाक इनामदार यांनी राजकारणात खऱ्या अर्थाने नव्या अध्यायाला सुरुवात केलीय.

राजकारण म्हणजे केवळ सत्तेचा खेळ नाही; तो लोकांचा विश्वास, संघर्षाची ताकद आणि परिस्थितीची परीक्षा घेणाऱ्या प्रवासाचे नाव आहे. या प्रवासात जय-पराजय हे दोन्ही कायमस्वरूपी सोबती असतात. एखादा नेता जिंकल्याने त्याचा संघर्ष संपत नाही आणि पराभव झाला म्हणून त्याचे राजकीय आयुष्य थांबत नाही. तब्बल तीन वेळा नगरसेवक राहिलेल्या अशफाक इनामदार यांनी विजयाची धुंद डोक्यात न जाऊ देता समाजाच्या व्यथा वेदना व त्यांच्या प्रश्नावर रात्रंदिवस काम केले. परंतु मागील निवडणुकीत त्यांचा अल्पशा मताने पराभव झाला व तो त्यांनी स्वीकारला सुद्धा . खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने त्यांनी समाजकारणाचा नवा अध्याय लिहायला सुरुवात केलीय. सेवेचा वसा वाहिला व आज या नगरपरिषदेच्या निवडणुकीत जोमाने वॉर्ड क्रमांक १८ मधून लढताय.

आजवरच्या राजकारण, समाजकारणाच्या काळात त्यांनी पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली तब्बल ३० पेक्षा जास्त सिमेंट रस्ते उभारले,वॉर्डातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, लाईटच्या नव्या खांबांची उभारणी, बिघडलेल्या लाईटची तातडीने दुरुस्ती, चारशेच्या जवळजवळ श्रावणबाळ , संजयगांधी निराधार योजनेचा लाभ सोबतच वॉर्ड मधील शेकडो महिलांना लाडक्या बहिणींच्या योजनेचा लाभ मिळवून दिला.बीड शहरात अचानक आलेल्या पावसाच्या पुरामुळे नागरिकांचे विस्कळीत झालेल्या आयुष्याला अशफाक इनामदार यांनी तातडीने पथकासह पूरग्रस्त भागात धाव घेत वेळोवेळी जगण्याचा आधार दिला आहे. बीड जिल्हा रुग्णालयात रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन अशफाक इनामदार यांनी वॉर्डात भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले. तरुणांचा उत्साह, समाजातील विविध संघटनांचे सहकार्य आणि त्यांच्या पुढाकारामुळे अपेक्षेपेक्षा जास्त रक्तसंचयन झाले. ज्याचा फायदा गोरगरीब व गरजु रुग्णांना होत आलाय.

कचरा व्यवस्थापनात सुधारणा करणे, गल्ली-रस्त्यांची नियमित सफाई, निर्जंतुकीकरण फवारणी या सर्व उपक्रमांचा देखील त्यांनी सातत्याने पाठपुरावा केलाय.आज राजकारणात अनेक गोंधळाचे आवाज आहेत, पण यामध्ये अशफाक इनामदार यांच्या कामांची चमक वेगळी ठळकपणे दिसत आहे. भविष्यातील मजबूत नेतृत्वाचा चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. बदलाची आस असलेल्या जनतेसाठी ते आशेचा दीप ठरत आहेत.

## राष्ट्रवादीच्या

त्यांच्या खास शैलीत विद्यमान प्रशासकीय त्रुटी आणि शहर विकासाचे मुद्दे प्रभावीपणे मांडणार असून, मतदारांना प्रेमलताताईंसारख्या अभ्यासू नेतृत्वाची गरज पटवून देतील.आज शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता कारंजा, जुना बाजार येथे रॅली, मोमीनपुरा भागात ७ वा.कॉर्नर सभा आणि इस्लामपुरा बाबा चौक येथे ८ वा. कॉर्नर सभा आयोजित करण्यात आली आहे. तर उद्या शनिवार दि.२२ नोव्हेंबर रोजी सकाळी जमजम कॉलनी येथे रॅली आयोजित करण्यात आली आहे. या निवडणुकीत प्रेमलताताई आणि सर्व ५२ नगरसेवक यांचे पारडे जड होण्याची शक्यता आहे.

## प्रभागच्या राहिलेल्या

अनेकानी मागे घेतले. उद्यापासून खऱ्या पध्दतीने रणसंग्राम निवडणूकीचा सुरू होणार आहे. प्रभाग क्रं. ६ मधून आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलिम यांनी तगडे उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरविले आहेत. मागील पाच टर्म नगरसेवक म्हणुन राहिलेले जलील लाला यांचीच चर्चा प्रभागात सर्वात जास्त आहे. प्रभागात तुतारीचा आवाज जोरदार वाढल्याने विरोधकांचे धाबे दणाणले असून आपला माणूस हक्काचा माणूस म्हणुन जलील लाला यांच्याकडे प्रभागातील मतदार बघत आहेत. आजपर्यंत प्रत्येकांच्या नेहमी कामी येणारे म्हणून जलील लाला यांची ओळख मतदारांमध्ये आहे. सर्वांना सोबत घेवून चालणारा आणि प्रत्येकाच्या सुख दुःखात नेहमी येणारे म्हणून जलील लाला यांची ओळख प्रभागात असून येणाऱ्या २ तारखेला तुतारीचा आवाज वाढेल आणि ३ तारखेला जलील लाला हे आपली विजयी मिरवणूक काढतील असेच काहीसे वातावरण प्रभागात दिसून येत आहे.